# मराठा अभिजनवर्गाचे हितसंबंध व रोहयोचे बदलते स्वरूप

विशाल जाधव

*रोहयोचे अनन्यसाधारण महत्त्व विषद करताना ह्या योजनेला मान्यता व कायद्याचे स्थान देण्यात महाराष्ट्रातील राजकीय अभिजनवर्गाच्या भूमिकेकडे व आनुषंगिक घटनाक्रमांकडे दुर्लक्ष झाले आहे. ही उणीव दूर करत. हा निबंध राज्यातील मराठा अभिजनवर्गाने काँग्रेस पक्ष, सहकारी क्षेत्र व पंचायती राज यंत्रणेसोबत रोहयोचा आपले ग्रामीण भागातील आश्रयदाता-आश्रित संबंध शाबूत राखण्यासाठी कसा उपयोग करून घेतला व आपल्या आर्थिक हितसंबंधांचा रोख बदलताच रोहयोच्या आशयात त्यानुरूप बदल घडवून आणण्यात कसे यश मिळवले. याचे विश्लेषण सादर करतो. दारिद्र्य निवारण कार्यक्रम गरिबांसाठी असले तरी, अशा कार्यक्रमांना इतर प्रभावशाली समाज घटकांचा पाठिंबा व सहभाग मिळवण्यासाठी, त्यांच्या हितसंबंधांची दखल घेणे आवश्यक ठरते, असे ह्या निबंधाचे तात्पर्य आहे.*

रोजगार हमी योजनेच्या (रोहयो) अमलबजावणीसाठी व त्याच्या संस्थात्मकीकरणासाठी राजकीय अभिजनवर्गाचा त्यास पाठिंबा मिळणे निकडीचे होते [पाहा हेरिंग व एडवर्डस् १९८३, गेंट १९८८]. परंतु, राजकीय अभिजनवर्गाने ह्या योजनेत सहभागी होण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या घटनाक्रमांचे, राजकीय घडामोडींचे व विशिष्ट स्थळकाळाचे तपशीलवार परिशीलन अभ्यासकांनी केलेले नाही. नातेसंबंध, जात व दातृत्व (patronage) यांचा रोहयोच्या अमलबजावणीवरील प्रभावाचा त्यांनी वेध घेतलेला नाही.

१९७० व १९८०च्या दशकात महाराष्ट्रात राजकीय अभिजनवर्ग म्हणून प्रस्थापित झालेल्या मराठा-कुणबी जात-समूहाने (caste cluster) आपल्या नातलग-जात बांधिलकीच्या आधारे राज्यातील काँग्रेसपक्षावर ताबा मिळवला व त्यांना अभिप्रेत असलेला ग्रामीण विकासाचा कार्यक्रम राबवला. या संदर्भात, या प्रक्रियेचे व रोहयोसारख्या गरीबी निवारणाच्या कार्यक्रमांमध्ये कशा प्रकारचे संबंध होते, याचा ऊहापोह मी येथे केला आहे.

रोहयो ही 'मागणी-प्रेरित' (demand-driven) रोजगार योजना आहे व कायद्याने दिलेली रोजगाराबाबतची 'हमी' त्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. रोहयो व्यापक प्रमाणात गरीबी हटवणारा जहाल कार्यक्रम नसेल परंतु ठरावीक अवर्षणग्रस्त परिस्थितीत तो परिणामकारक ठरला. रोहयो निर्मित जवळजवळ दोन-तृतीयांश रोजगार हा राज्यातील एक-तृतीयांश जिल्ह्यांमध्ये केंद्रित आहे [देव १९९६]. मराठा-कुणबी जातसमूह ह्या जिल्ह्यांमध्ये बहुसंख्य आहे. या पार्श्वभूमीवर, पश्चिम महाराष्ट्रातील सत्ताधारी मराठा अभिजनवर्ग व रोहयोच्या निधीच्या वाटपात काही सहसंबंध आहे का, याचा मागोवा मी या निबंधात घेतला आहे.

१९६०-७०च्या दशकात राज्यातील राजकीय अभिजनवर्ग म्हणून पुढे आलेला पश्चिम महाराष्ट्रातील मराठा-कुणबी जातसमूह हा आजही आपले वर्चस्व टिकवून आहे [लेले १९९०]. वसाहातिकपूर्व काळापासून वारसा म्हणून मिळालेल्या नातेसंबंधावर आधारलेल्या दातृत्व व्यवस्थेद्वारा (ज्यास लेले पितृसत्ताकवादी दातृत्व म्हणून संबोधितात; कित्ता:१५०) हा जातसमूह एक राजकीय गट म्हणून संघटित झाला. एव्हाना, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली ही दातृत्व पध्दती राजकारणामध्ये विस्तारली व त्याद्वारे सहकार क्षेत्र व पंचायती राजसारख्या शासकीय संस्थांची उभारणी झाली. तसेच, या अभिजन वर्गाने माळी, धनगर, तेली, लिंगायत, वंजारी, महार व इतर जातींतील नेतृत्वाला काँग्रेस पक्ष व शासकीय संस्थांमध्ये सामावून घेतले (ज्यास लेले पितृदायक दातृत्व संबोधितात; कित्ता:१५७). तथापि, राज्यातील काँग्रेस पक्षातील धोरणकर्ते व निर्णयकर्ते म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील मराठा अभिजनवर्गाचे वर्चस्व अबाधित राहिले.

येथे राजकीय राजवट व गरीबी यांतील संबंध जाणून घेण्यासाठी मी 'अभिजनवर्ग' या संकल्पनेचा का उपयोग करत आहे याचे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या संमिश्र राजकारणात गरीबी निवारणाच्या कार्यक्रमांचे मूल्यमापन करताना विचारसरणी बरोबर कर्त्यांची (actors) भूमिकाही महत्त्वाची ठरते. जात-वर्गविषयक विचारसरणींवर भर देताना, या घटकाचे योगदान कधीकधी दुर्लक्षिले जाते. जातीय व वर्गीय हितसंबंधांमधील दुवा म्हणून कर्ते कळीची भूमिका वठवतात.

हा निबंध पश्चिम महाराष्ट्राच्या मराठा अभिजनवर्गाची रोहयोमधील सहभागाची व त्याचे रोहयोच्या यशामधील योगदानाची कारणमीमांसा करतो. तसेच, कालौघात रोहयोचे महत्त्व कमी होण्यात या कार्यक्रमाला पाठिंबा देणाऱ्या अभिजनवर्गाच्या हितसंबंधांतील बदलांशी त्याचे असलेले नाते दाखवण्याचा प्रयत्न मी येथे केला आहे.

## मराठा-कुणबी जातसमूहाचे संघटीकरण

महाराष्ट्रातील जात व राजकारण यांचा मागोवा घेणाऱ्या अभ्यासकांच्या मते [लेले १९९०; पळशीकर १९९४; वोरा १९९६] मराठा-कुणबी विधिकार राज्यातील राजकीय अभिजनवर्गाचे प्रतिनिधित्व करतात. या जात-समूहातले सभासद ग्रामीण भागातील व मुख्यत्वे कृषी वा संलग्न व्यवसायांशी निगडित असतात. नातेसंबंधांद्वारे जोडलेला मोठा सलग सामाजिक गट म्हणून त्याकडे पाहता येते. हा जात-समूह सहसा एकजिनसी सामाजिक गट म्हणून वावरत असला तरी आर्थिक निकषांनुसार त्याचे जमीनदार ते सीमांत शेतकरी व भूमिहीन शेतमजूर असे अंतर्गत स्तरीकरण झालेले आहे. लेलेंच्या मतानुसार (१९९०:११६-११७) राज्यातील ३१% लोकसंख्या राज्यभर पसरलेल्या मराठा-कुणबी जात-समूहाची आहे.

१९५०च्या उत्तरार्धात संयुक्त महाराष्ट्र चळवळीने जोम धरायच्याअगोदर, सामाजिक सुधारणेची ब्राम्हणेतर चळवळ व राष्ट्रीय चळवळीतील सहभागातून मराठा-कुणबी जात-समूह आकारास आला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत 'शेटजी' (मुंबईतील मारवाडी, गुजराथी व इतर धंदेवाईक उच्चभ्रू वर्ग) व 'भटजी' (काँग्रेसमधील ब्राम्हण) यांना लक्ष्य बनवून मराठा-कुणबी जात-समूहाने आपली पकड त्यावेळच्या काँग्रेस-विरोधी संयुक्त महाराष्ट्र समितीमार्फत बळकट केली [पेंडसे १९६५]. लहान व मध्यम मराठा-कुणब्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शेतकरी-कामगार पक्षाने (शेकाप) ग्रामीण विकासाचा कार्यक्रम व ग्रामीण नेतृत्वाला वाव देऊन, मराठा-कुणबी गटाच्या बांधणीस मोठा हातभार लावला. १९५७ च्या निवडणुकीत काँग्रेसचे पश्चिम महाराष्ट्रात पानिपत झाल्यानंतर त्यावेळच्या मुंबई प्रांतात कसेबसे सरकार स्थापून, काँग्रेसने यशवंतराव चव्हाणांना प्रमुखपद दिले [लेले १९९०:१६८]. चव्हाणांनी विविध पक्षांत, खासकरून पश्चिम महाराष्ट्रात शेकापमध्ये, व राज्यभर विखुरलेल्या मराठा-कुणबी नेत्यांना काँग्रेसच्या छत्राखाली एकत्रित तर केलेच, त्याचबरोबर शेकापच्या ग्रामीण विकासाच्या विचारसरणीचा नेहरुवादी विकास संकल्पनेशी मेळ घालून काँग्रेस पक्षाला संजीवनी दिली. शेकापचे महत्त्वाचे मराठा पुढारी व काही समाजवाद्यांना जवळ करून, राज्यातील काँग्रेस पक्षात 'शहरी' प्रभाव कमी करून, चव्हाणांनी काँग्रेसला महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतरच्या १९६२ मधील प्रथम विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवून दिले [लेले १९९०:१६८-६९,१८७].

यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली मराठा-कुणबी अभिजनवर्गाने सहकारी संस्था व पंचायती राज संस्थांमार्फत ग्रामीण विकास साधण्याचे लक्ष्य ठेवले. अशा दोन विकेंद्रित संस्थांना चालना देऊन, एकीकडे ग्रामीण अभिजनवर्गाचा काँग्रेस पक्ष व राज्य स्तरीय श्रेष्ठींशी संबंध प्रस्थापित करणारा राजकीय मार्ग खुला केला तर दुसरीकडे, सहकारी संस्थांमार्फत काँग्रेस पक्षाला नियमित निधी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली [पाहा बावीस्कर १९८०, ॲटवूड १९९२; चौसाळकर १९९५:३४].

महाराष्ट्रात कृषी सहकारी संस्था म्हणून कार्यरत असलेल्या विपणन सहकारी संस्था, पत संस्था व कृषी प्रक्रिया संस्था या तिघांपैकी शेवटच्या दोन सहकारी संस्थांचं राज्याच्या ग्रामीण राजकीय-अर्थकारणावर सर्वाधिक प्रभाव पडला. जिल्हा केंद्रीय सहकारी बँकांमार्फत (District Central Co-op. Bank--DCCB) शेतकरी, कृषी-उत्पादन प्रक्रिया संस्था व इतर विकासात्मक कामांना पतपुरवठा होत असल्याकारणाने, या बँका जिल्हास्तरीय विकासात केंद्रीय भूमिका निभावतात. साहजिकच, या बँकेचे संचालकपद एक सत्ताकेंद्र बनले व १९६०च्या दशकापासून वसंतदादा पाटील, गुलाबराव पाटील, भाऊसाहेब थोरात व रत्नाप्पा कुंभारांसारख्या राज्यातील प्रमुख राजकीय नेत्यांनी या बँकांमध्ये महत्त्वाची पदे भूषविली [चौसाळकर १९९५:३५]. १९६५ ते १९७२ दरम्यान DCCBच्या संचालक व अध्यक्षपदावरील नेतृत्वातून राज्य विधानमंडळात बत्तीस-एक आमदार म्हणून निवडून गेले [खेकळे १९९९:९२, तक्ता ५]. यातील अधिकतर पश्चिम महाराष्ट्र व मराठ-कुणबी जात-समूहातील होत.

सहकारी साखर कारखानदारीसारख्या कृषी-उत्पादन प्रक्रिया संस्था DCCB पेक्षाही अधिक प्रभावशाली ठरल्या. १९८०च्या दशकाच्या अखेरीस महाराष्ट्रात शंभरहून अधिक साखर कारखाने सहकारी क्षेत्रात अस्तित्वात आले. येथेही वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार, यशवंतराव मोहिते व बाळासाहेब विखे-पाटीलांसारखे पुढारी संचालकपदी राहिल्यामुळे, मराठा-कुणबी जात-समूहाला महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दीर्घकालीन आधार मिळाला. खेकळे यांनी दाखवून दिल्याप्रमाणे १९६७ ते १९७२ दरम्यान जवळपास ६० टक्के विधिकार व अनेक राज्य व केंद्रीय मंत्री व जिल्हा परिषद अध्यक्ष या स्तरातून आलेले होते (१९९९:१२३-४, तक्ता ७).

राज्य स्थापनेनंतर नावारूपाला आलेले आणखी एक सत्ताकेंद्र म्हणजे जिल्हा परिषद अध्यक्षाचे पद. राज्य स्तरीय वा केंद्रीय विकास योजनांच्या अमलबजावणीसाठी राज्य वा केंद्र सरकारला जिल्हा परिषदांवर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे, जिल्हा परिषदांचे आर्थिक व राजकीय सत्ताकेंद्र म्हणून महत्त्व वाढले. १९६२ ते १९७२ दरम्यान १७ राज्यस्तरीय मंत्री व ८ केंद्रीय मंत्री मराठी-कुणबी जातसमूहातील होते तर पंचायती राज संस्थांतून उदयास आलेल्या ६० टक्के नेतृत्वाला राज्य विधानमंडळावर निवडून जाता आले होते [खेकळे १९९९:१७१, तक्ता १]. थोडक्यात, १९७०च्या दशकाच्या सुरुवातीपर्यंत काँग्रेस पक्ष, सहकारी संस्था व पंचायती राज संस्था यांच्यावरील प्रभुत्वाद्वारे मराठा अभिजनवर्गाची राज्यातील राजकीय-अर्थकारणावर भक्कम पकड बसली.

## काँग्रेसांतर्गत चढाओढ व रोहयो कायदा

रोहयो सुरू करण्याचे श्रेय महाराष्ट्र विधिमंडळाचे त्यावेळचे अध्यक्ष व समाजवादी वळणाचे काँग्रेस नेते वि. स. पागे यांच्या प्रयत्नांना दिले जाते. १९६४-६५ मध्ये सांगली जिल्ह्यात त्यांनी एकात्मिक ग्रामीण विकासाचा लहानसा प्रयोग सुरू केला, ज्याला १९७०च्या दशकाच्या सुरुवातीच्या अवर्षणाच्या वर्षांत, राज्य सरकारने गरीबी निर्मूलन योजनेचे राज्यव्यापी स्वरूप दिले.

१९७०च्या दशकाच्या सुरुवातीस सलग तीन वर्षांच्या अवर्षणामुळे, सत्ताधारी काँग्रेस पक्षाने कृषीक्षेत्र विकासासाठी व ग्रामीण भागातील गरीबी निवारणासाठी दिलेली आश्वासनं पाळली नाहीत, हे प्रत्ययास आले. राज्यातील टंचाईग्रस्त विभागांच्या सर्वेक्षणासाठी नेमलेल्या सत्यान्वेषण समितीने (१९७३) राज्यातील १२ जिल्ह्यांना अवर्षण-प्रवण जिल्हे म्हणून घोषित केले [सुब्रम्हण्यम् १९७५]. अनियमित पर्जन्यमानाचे हे जिल्हे राज्यातील ६० टक्के पेरणी क्षेत्र व्यापून असत [देव १९९६:५६०-६३]. सलग तीन वर्षांच्या अवर्षणामुळे राज्यभर अन्नधान्याचा व पिण्याच्या पाण्याचा तीव्र तुटवडा निर्माण झाला (पाहा, *इकॉनॉमिक टाईम्स*, ऑगस्ट २१, १९७२, पृ १; *फायनॅनशियल एक्सप्रेस*, ऑगस्ट २, १९७२, पृ १; *द हिंदू*, ऑगस्ट ५, १९७२, पृ. १). राज्यातील अधिकतर शेती पावसावर अवलंबून असल्यामुळे, अवर्षणकाळी ग्रामीण भूमिहीनांचे शहरी भागात मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले. इतकेच नव्हे, शुष्क प्रदेशातील ५० ते १०० एकर जमीनधारक श्रीमंत शेतकरीही उपजीविकेच्या शोधात नगरांकडे स्थलांतरित झाले. मराठा-कुणबी जातसमूहातील अधिकतर लहान व मध्यम शेतकरी राज्यात काँग्रेस पक्षाचे पाठीराखे राहिलेले आहेत. १९७०च्या दशकाच्या सुरुवातीस भूकबळीच्या काही घटना उघडकीस आल्यानंतर झालेल्या सार्वत्रिक टीकेला दबून राज्य सरकारने तेंव्हाचे पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम मंत्री, व्ही. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अर्वषणग्रस्तांच्या मदतीसाठी समिती नेमली. परंतु याने विरोधकांचे समाधान न झाल्यामुळे, अवर्षण परिस्थितीवर कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी अजून एका समितीची (सुकथनकर समिती १९७२) स्थापना करण्यात आली [देव १९९६].

अवर्षणामुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व टंचाईच्या मुद्यावरून ग्रामीण जनतेला विरोधी पक्षांनी संघटित करायला सुरुवात केली तर दुसरीकडे, या मुद्यावरून काँग्रेस पक्षांतर्गत दुफळी माजून, काँग्रेसमधील अभिजनवर्गाच्या एका गटाने रोहयोच्या अमलबजावणीसाठी सरकारवर दबाव आणण्यास सुरुवात केली.

१९६०च्या उत्तरार्धापर्यंत राज्य काँग्रेसमध्ये एकीकडे, पश्चिम महाराष्ट्रातील मराठा पुढारीगण तर दुसरीकडे, राज्यातील इतर भागातील मराठा व इतर जातींचे नेते व पश्चिम महाराष्ट्रातील सत्तेपासून वंचित ठेवलेले/राहिलेले असंतुष्ट पुढारी असे ध्रुवीकरण अस्तित्वात आले होते. याच सुमारास, पक्षाच्या केंद्रीय स्तरावर इंदिरा गांधी सत्तारूढ झाल्या व त्यांनी प्रादेशिक काँग्रेस नेतृत्वाच्या आधारांचे खच्चीकरण करून सत्ता आपल्याकडे एकवटण्यास सुरुवात केली. राज्य स्तरावर यशवंतराव चव्हाणांना मानणारा वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते व शरद पवार यांचा एक गट तर रामराव आदिक, ए. आर. अंतुले, बाबासाहेब भोसले व नासिकराव तिरपुडे यांचा इंदिरा गांधींना निष्ठा वाहिलेला दुसरा गट, असे काँग्रेसांतर्गत विभाजन दृष्टिस पडू लागले. राज्यातील प्रस्थापित मराठा गटाला शह देण्याचे इंदिरा गांधींचे प्रारंभीचे प्रयत्न फलद्रूप झाले नाहीत. परंतु १९७०च्या दशकातील अवर्षणाने त्यांना अत्यावश्यक संधी मिळवून दिली व जमीन सुधारणा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी काँग्रेसमधील त्यांच्या निष्ठावंतांच्या आधारे त्यांनी मराठा गटाला आव्हान दिले [लेले १९९०:१७-८१]. परिणामी, शेत जमीनीची कमाल धारणा कमी करणारा प्रस्ताव इंदिरा निष्ठावंतांनी विधान सभेमध्ये चर्चेसाठी मांडला. पश्चिम महाराष्ट्रातील बागायतदार मराठा अभिजनवर्गाला हे रुचले नाही [खेकळे १९९९:५५-७२]. शेवटी, समझोता म्हणून, अनेक पळवाटा असलेला परंतु कमाल जमीन धारणा घटवणारा ठराव प्रदेश काँग्रेसने मंजूर केला. त्याचबरोबर, सहकारी साखर कारखान्यांचे नेतृत्व यशवंतरावांच्या पाठीशी असल्यामुळे, कोकण, विदर्भ व मराठवाड्यातील इंदिरा समर्थकांनी ह्या सहकारी संस्थांतील एकाधिकारशाहीविरुद्ध आवाज उठवायला सुरुवात केली. राज्यातील ६०-७०% उपजाऊ जमीन ऊस लागवडीखाली असल्याची त्यांनी टीका केली.

अन्यत्र, अवर्षणग्रस्त परिस्थितीमुळे राज्यातील मराठा नेतृत्व व मराठा शेतकरी वर्ग यांत वितुष्ट निर्माण होऊन, मराठा जातीच्या एकसंधतेला तडा गेला. अवर्षणामुळे भरडलेल्या मराठा शेतकरी समूहाला समाजवादी वळणाच्या काँग्रेसमधील फुटीरतावाद्यांनी बिगर-पक्षीय राजकीय मंचावरून [Non-Party Political Formations (NPPF)]संघटित करायला सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर ६२ आमदारांच्या उपस्थितीत व यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व तेंव्हाचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हजेरीत, १९७२च्या काँग्रेस समितीच्या बैठकीत राज्यव्यापी रोहयो लागू करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला [खेकळे १९९९]. ह्याद्वारे, राज्यातील मराठी नेतृत्वाने इंदिरा गांधींचाच 'गरीबी हटाओ' घोषणेचा आधार घेत आपल्या पक्षांतर्गत विरोधकांवर व पक्षबाह्य विरोधकांवर डाव उलटवला. परंतु, रोहयो एक कायम स्वरूपी कार्यक्रम म्हणून राबवण्यासाठी राज्यातील राजकीय वर्तुळात अजून काही घडामोडी होणे शिल्लक होते.

१९७०च्या दशकाच्या मध्यावर काँग्रेस पक्ष राज्य व केंद्रीय स्तरावर उलथापालथीतून जात होता. अवर्षणाचे सावट जरी हटले असले तरी देशपातळीवर काँग्रेस राजवटी विरोधात जयप्रकाश नारायण यांनी 'संपूर्ण क्रांती'चा दिलेला नारा व प्रदेश काँग्रेसमधील

यादवीमुळे काँग्रेसच्या प्रतिमेची क्षति झाली होती. या मोक्यावर, डावे पक्ष व इतर विरोधी पक्षांच्या साहाय्याने NPPFsनी कायम स्वरूपी रोहयोंची मागणी करून, एक स्थायी निधी त्यासाठी उपलब्ध करावा यासाठी जोर धरला. मार्च १९७३ मध्ये तेंव्हांचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी रोहयोंसाठी पाच कोटी रुपयांच्या तरतुदीचे अभिवचन दिले परंतु ही रक्कम अपुरी ठरली. ह्याच सुमारास NPPFsनी मुंबईतील कामगारांकडून निधी उभारून. ती रोहयोंसाठी उपयोगी आणण्याचे ठरवले [जोसेफ २००५].

अर्थसंकल्पीय तरतुदीतून रोहयोंसाठी निधी उभारणं राज्य सरकारला कठीण जात होते तर दुसरीकडे, केंद्र सरकार मदतीचा हात पुढे करायला तयार नव्हते. किंबहुना, यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांनी इंदिरा निष्ठावंतांचा प्रतिवाद करण्यासाठी राज्यातील विकास कार्यक्रमांमधील अपुरेपणासाठी केंद्र सरकारच्या अनुदार भूमिकेला जबाबदार धरले [लेले १९९०:१८९].

या पार्श्वभूमीवर वि. स. पागे यासारख्या समाजवादी वळणाच्या काँग्रेसजनांनी रोहयोच्या अमलबजावणीसाठी शहरी जनता व ग्रामीण श्रीमंतांकडून करवसुलीच्या रूपात महसूल उपलब्ध करून देण्यासाठी रोहयोला वैधानिक पाठबळ देण्याची शिफारस केली. प्रबळ मराठा अभिजनवर्गाने या प्रस्तावाला उचलून धरले. परिणामी, बागायत शेती, संघटित उद्योग, फायदेशीर व्यवसाय, संपत्ती व मालमत्ताधारक, शाश्वत नोकरदार इत्यादिंसारख्या कर भरणाऱ्या सर्व क्षेत्रांवर १९७५मध्ये खास कर लादला गेला. प्रत्यक्षात मात्र बागायतदार शेतकऱ्यांकडून करवसुली कधीच केली गेली नाही. शहरांतून गोळा केलेल्या निधीचे ग्रामीण विकासासाठी पुनर्वाटप करायचे, हे राज्यातील, खासकरून पश्चिम महाराष्ट्रातील, मराठा अभिजनवर्गाच्या राजकीय व आर्थिक हितसंबंधांशी सुसंगत होते. [गॅट १९८८].

जानेवारी १९७५मध्ये इंदिरा निष्ठावंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शंकरराव चव्हाणांची मुख्यमंत्रीपदी नेमणूक होण्याने व त्याचवर्षी जूनमध्ये आणीबाणी लागू करण्याने, पश्चिम महाराष्ट्रातील मराठा अभिजनांविरुद्ध राजकीय आघाडी उभारून रोहयोच्या संस्थात्मकीकरणाच्या अपेक्षा मावळल्या. आणीबाणीनंतरच्या निवडणुकीत काँग्रेसला राष्ट्रीय स्तरावर तडाखा बसला व राज्यात डाव्या पक्षांच्या पाठिंब्यावर अस्तित्वात आलेल्या काँग्रेसप्रणीत संमिश्र सरकारने, त्यांच्या मागणीस अनुमोदन देऊन वसंतदादा पाटीलांच्या नेतृत्वाखाली रोहयोच्या कायम स्वरूपी अमल-बजावणीच्या विधेयकास कायद्याचे रूप दिले.

## ग्रामीण अभिजन व रोहयोतील तरतुदी

वरील चर्चेवरून रोहयोच्या संस्थात्मकीकरणाला पश्चिम महाराष्ट्रातील मराठा अभिजनवर्गाकडून मिळालेल्या पाठिंब्याची दोन कारणे संभवतात. एक, सलग अवर्षणापायी निर्माण झालेल्या ग्रामीण भागातील असंतोषामुळे, राज्यस्थापनेनंतर प्रथमच, मराठा वर्चस्वाला धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली. रोहयोच्या सुरुवातीपासून त्या कार्यक्रमाशी निगडित असलेले माजी आमदार पी. बी. पाटील व माजी नोकरशहा पी. एस. ठाकूर हे या घडामोडी मागे राजकीय कारण असल्याचे वर्तवतात (मुलाखत, सप्टेंबर २, २००३). व्ही. एम. सिरशीकरांच्या मते,

> मराठा अभिजनवर्गाला एव्हाना कळून चुकले होते की काँग्रेस पक्ष, सहकारी क्षेत्र व पंचायती राज संस्थांप्रमाणे रोहयोचे दीर्घकालीन महत्त्व आहे व दातृत्वाच्या कक्षा रुंदावून त्यांच्या अधिमान्यतेला अधिक दृढ करण्यास त्याची मदत होईल (मुलाखत, मे १, २००२).

दोन, मराठा अभिजनवर्गाचे प्रादेशिक व जातीय हितसंबंध हे ग्रामीण क्षेत्राशी निगडित असल्यामुळे, जमीनदार मराठा वर्गाकडून सुरुवातीला विरोध होऊनसुध्दा, रोहयो अमलात आणणे हे त्याच्या राजकीय हिताचे होते. राजकीय सर्वमान्यता मिळाल्यावर, रोहयोबद्दल शंका उपस्थित करणेही अशक्यप्राय होऊन बसले.

अभ्यासकांच्या मते [गॅट १९८८; देव १९९६] रोहयोने गरीबांना रोजगार पुरवला तरी या कार्यक्रमाचे फायदे काही प्रमाणात एकांगी व मुख्यत्वे, ग्रामीण अभिजनवर्गाच्या पदरी पडले. रोहयोच्या कामांवर स्थानिक नियंत्रण ठेवून, शेतीसाठी लागणाऱ्या श्रम-पुरवठ्याला बाधा पोहचणार नाही व शेतमजुरीचे दर वाढणार नाहीत याकडे या वर्गाने नजर ठेवली. त्यामुळे काही अभ्यासकांनी [हेरिंग व एडवर्डस् १९८३: ५८४-६] रोहयोला शहरी वर्गाकडून ग्रामीण सधनांकडे संसाधनांचे पुनर्वाटप करणारी यंत्रणा म्हणून चित्रित केले, यात आश्चर्य नाही. त्याचबरोबर, १९७५ ते १९८८-८९ मधील रोहयोखालील कामांचे वाटप एकतर्फी प्रादेशिक विभागणी दर्शविते [मूर व जाधव २००५, तक्ता २, रकाना क]. या काळात संख्येने कमी परंतु मराठा वर्चस्व असलेल्या जिल्ह्यांकडे मोठ्या प्रमाणात रोहयोचा निधी वळवण्यात आला.

वेळोवेळी समाविष्ट केलेल्या रोहयोसंबंधीच्या तरतुदीसुध्दा फक्त अभिजनवर्गाच्या हिताच्याच का ठरत होत्या? १९७२ मध्ये सुस्त शेती हंगामातच रोहयोची कामं उपलब्ध करण्यासंबंधीची तरतूद करण्यात आली. त्यासोबत, ह्या कामांवरील वेतन शेतजमजुरीच्या वेतनापेक्षा जाणूनबुजून कमी ठेवण्यात आले. या दोन तरतुदींद्वारा शेतीसाठी स्वस्त श्रमाचा पुरवठा अबाधित ठेवून जमीनधारक मराठा अभिजनवर्गाचे हितसंबंध जोपासले गेले; सोबत, रोहयो कामांची स्थळं गावाच्या ५ मैल त्रिज्यातच पुरवली पाहिजेत अशी तरतूद करून ग्रामीण अभिजनांना मजुरांचा तुटवडा भासणार नाही याची काळजी घेतली गेली. १९७२ मधील खुद्द रोहयोच्या ठरावात कृषी व संलग्न व्यवसायांना सर्वाधिक प्राधान्य दिले गेले.

१९७८च्या कायद्याने रोहयोचे सहकारी संस्था व पंचायती राज संस्थांशी संस्थात्मक दुवे जोडल्यामुळे, स्थानिक व राज्यस्तरीय नेतृत्वाला जोडणारी एक जटिल प्रशासकीय साखळी अस्तित्वात

आली. आमदारांना तालुका व जिल्हास्तरीय पंचायती राज संस्थांमध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध घालणाऱ्या थोड्या राज्यांपैकी महाराष्ट्र एक होय. त्यामुळे, आमदार जरी व्यापक अर्थाने विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाला दुजोरा देत तरी संसाधनं व दातृत्वावरील आपले नियंत्रण गमावण्यास ते तयार नसत. यासंदर्भात, तालुका व जिल्हास्तरावर स्थापन झालेल्या रोहयो समितींवर आमदारांना नेमून, त्यांना रोहयोच्या अमलबजावणीत सक्रिय करता तर आलेच, तसेच या समित्यांमुळे मंत्रीमंडळात किंवा सहकारी संस्थांत सहभागी करून न घेता आलेल्या मराठा नेतृत्वाच्या काही गटांनाही संतुष्ट करता आले.

## मराठा अभिजनवर्ग : बदलत्या राजकीय व आर्थिक निष्ठा

संरचनात्मक समायोजन, शिथिलीकरण व जागतिकीकरणाच्या संदर्भात १९९०च्या दशकात महाराष्ट्रातील आर्थिक वास्तवाला नवीन परिमाणं लाभली. पश्चिम महाराष्ट्रातील मराठा अभिजन वर्गाने फुलोत्पादन, फलोत्पादन व अन्न प्रक्रियांसारख्या कृषी-संलग्न व्यवसायांना चालना देऊन जागतिक बाजारपेठेशी जुळवून घेण्यास सुरुवात केली. या बाजारपेठेला प्रोत्साहन देणाऱ्या माहिती तंत्रज्ञान, बँकिंग, विमा व मनोरंजन उद्योगासारख्या सेवा क्षेत्रातील उद्योगांशी त्यांनी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. कृषी क्षेत्राशी निगडित 'कमोडिटी मार्केटस्'सारख्या पुन्हा नव्याने प्रकाशझोतात आलेल्या संस्थांनाही त्यांनी चालना दिली.

राज्य सरकारला शेतीच्या जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारायला लावण्याचे श्रेय शरद पवारांकडे जाते. फलोत्पादन व निर्यातक्षम शेती उत्पादन घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले. या संदर्भात, शहरी व ग्रामीण अभिजनवर्गाच्या हितसंबंधांची नव्याने आखणी झाली [पळशीकर व देशपांडे १९९९].

खालील आकडेवारी १९९१-२००१ दरम्यान वरील प्रत्येक क्षेत्रातील वाढ दर्शवते. कृषी क्षेत्राने २८ टक्के तर उद्योग क्षेत्रातील नोंदणीकृत कारखाने व त्यातील कामगारांनी अनुक्रमे ५२ व १२ टक्के वाढ नोंदवली. बँकिंग, दळणवळण, विपणन, संप्रेषणसारख्या क्षेत्रांनी लक्षणीय ५७ टक्के वाढ नोंदवली (*जिल्हा सांख्यिकीय सारांश*, महाराष्ट्र शासन, १९९१-९२ ते व २००१-०२). कृषी क्षेत्रासाठी नवनवीन तंत्रज्ञानांची साधनं व संप्रेषणाच्या सुविधा निर्माण केल्या जात आहेत. दहाव्या पंचवार्षिक योजनेसाठी नेमलेल्या फलोत्पादन कार्यकारी गटाच्या अहवालात सेवाक्षेत्रातील विस्तार व कृषी व संलग्न व्यवसायांमधील वाढ यांच्यात महत्त्वपूर्ण सहसंबंध असल्याचे मांडले आहे. या अहवालानुसार (जून २००१) महाराष्ट्रात १९९१-९२ ते १९९८-९९ या कालावधीत फलोत्पादनाखालील जमीन ७० टक्क्याने व त्यावरील उत्पादन ११३ टक्क्याने वाढले (कित्ता:१६, तक्ता २-३). विशिष्ट प्रदेश विशिष्ट फलोत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत. उदाहरणार्थ, नाशिक जिल्ह्यातील निफाड, डिंडोरी व काळवण तालुके द्राक्षांच्या बागांसाठी तर सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर व पाचगणी स्ट्रॉबेरी व फुलांच्या निर्मितीसाठी ओळखले जातात. शेती व संलग्न व्यवसायांच्या जागतिकीकरणामुळे पश्चिम महाराष्ट्रातील मराठा अभिजनवर्गाचे हितसंबंध आता बिगर-कृषी, शहरी इलाख्यांपर्यंत विस्तारले होते [पळशीकर व देशपांडे १९९९]. यामुळे, राज्यातील शहरी असंघटित क्षेत्रास तो आपला नवा आधार बनवू पाहत आहे.

महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर मराठा-कुणबी जातसमूह राज्यातील काँग्रेस पक्षाचा राजकीय कणा ठरला. परंतु १९७०च्या दशकाच्या शेवटापासून प्रदेश काँग्रेसमधील गटबाजीमुळे हे चित्र हळूहळू बदलू लागले. १९७२ पासून काँग्रेस पक्षाला गटबाजीची झळ लागली. १९७८ मध्ये यशवंतराव चव्हाणांशी निष्ठावंत राहिलेला गट, सहकारी साखर कारखानदारीमध्ये पाय रोवलेला व वसंतदादा पाटलांना आपला अनौपचारिक नेता मानणारा गट व शंकरराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली संघटित झालेला, अधिकतर बिगर मराठा-कुणबी, मराठवाड्यातील गट, असे तीन गट अस्तित्वात आले [पळशीकर व देशपांडे १९९९]. मराठा नेत्यांमधील सुंदोपसुंदी व प्रदेश काँग्रेस कारभारात इंदिरा गांधींच्या ऊठसूट हस्तक्षेपामुळे राज्यातील काँग्रेसच्या धुरीणत्वाला खिंडार पडले व मराठा नेतागण अन्य राजकीय पक्षांकडे आकृष्ट होऊ लागला [लेले १९९०:१७७-८०]. काँग्रेसने पश्चिम महाराष्ट्रातील थोड्या श्रीमंत मराठा घराण्यांच्या बाजूने पक्षपात केल्यामुळे गरीब मराठा काँग्रेसपासून दुरावू लागला [पळशीकर व देशपांडे १९९९]. १९८०च्या दशकाच्या उत्तरार्धात विदर्भ व मराठवाड्यातील मराठा-कुणबी अभिजनवर्गाची काँग्रेसप्रती असंतुष्टता वाढत होती. त्याचबरोबर, वंजारी, तेली, लिंगायत, माळी, दलित व इतर जातीगटही काँग्रेसला आपला खरा प्रतिनिधी मानेनासे झाले.

१९८८मध्ये मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तारामुळे, मराठवाड्यातील मराठा वर्ग दुखावला गेला. काँग्रेसप्रणीत पश्चिम महाराष्ट्रातील मराठा अभिजनांनी मराठवाड्यात अनावश्यक ढवळाढवळ केल्याची त्यांची समजूत झाल्याने, त्यांनी शिवसेना-भाजपला जवळ करायला सुरुवात केली. याच सुमारास मराठवाडा व विदर्भच्या विकासाच्या प्रश्नावरून काँग्रेसांतर्गत मतभेद चव्हाट्यावर येऊन पश्चिम महाराष्ट्रातील मराठ्यांच्या वर्चस्वाला शह बसला. वोरा व पळशीकरांच्या मते (१९९६) राज्यातील काँग्रेस पक्ष हा कोणतीही विचारसरणी नसलेल्या गटांचा जमाव बनला होता. एखाद्या नेत्याच्या नेतृत्वाखाली एकवटलेला क्रियाशील गट म्हणूनही त्याचे अस्तित्व उरले नव्हते. सहकारी यंत्रणेमुळे मराठा अभिजनवर्ग इतका शक्तीशाली व धनाढ्य झाला होता की त्यांना निवडणूका जिंकण्यासाठी कोणत्याही पुरोगामी वा लोकानुनयवादी कार्यक्रमांवर निर्भर राहण्याची आवश्यकता भासत नव्हती. त्यांच्या निवडणुकींच्या गणितात गरीब निरुपयोगी होते.

१९८०च्या दशकाच्या शेवटाला कोकण व मराठवाड्यात शिवसेना व भाजपचे काँग्रेस पक्षाला शह देण्याइतपत वजन वाढले. याबरोबर, जनता दलही काँग्रेसला प्रतिस्पर्धक म्हणून उभा ठाकला. या तिन्ही पक्षांनी, खासकरून मराठवाड्याच्या स्थानिक पातळीवर, जम बसवला व तेथील मराठा अभिजनवर्गाचे राज्य-काँग्रेस नेतृत्वाशी नाते तुटले. १९९५च्या विधानसभा निवडणुकीत सेना-भाजप युतीचे सरकार राज्यात सत्तेवर आले. १९९० मध्ये केंद्र सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय घेतला व कुणबी हे त्यात इतर मागासवर्गीय म्हणून गणले गेल्यामुळे, काँग्रेसचा राज्यातील मराठा-कुणबी राजकीय आधार दुभंगला. मराठवाडा व कोकणातील कुणबी भाजप व शिवसेनेकडे सरकले [पळशीकर व देशपांडे १९९९]. थोडक्यात, १९८०च्या दशकाच्या अखेरीस, काँग्रेस पक्ष, सहकारी संस्था व पंचायती राज संस्था यांतून सत्ताधीश झालेला महाराष्ट्रातील मराठा अभिजनवर्ग, शिवसेना व भाजपच्या शिरकावामुळे, विस्कळीत झाला.

## १९९०चे दशक व रोहयोची फेररचना

१९८०च्या दशकाच्या शेवटी राज्य सरकारच्या भांडवली खर्चापैकी एक पंचमांश भाग रोहयोवर खर्च होत असे. या अर्थी, १९७५-७६ ते १९८७-८८ हा रोहयोच्या अमलबजावणीचा उत्कर्षबिंदू होता व रोहयोसाठी त्या काळात लोकांच्या चळवळीही जोमात होत्या [मूर व जाधव २००५]. परंतु याच काळात रोहयो संदर्भात दोन महत्त्वपूर्ण बदल घडले. एक, १९८६ मध्ये रोहयोमधील वेतनात दुप्पटीने वाढ करण्यात आली, ज्यामुळे जनचळवळींच्या मागणीनुसार त्यांचा दर किमान वेतनाच्या पातळीवर आणण्यात आला. दोन, १९८८ व १९९०मध्ये रोहयो कायद्यात बदल करण्यात आले, ज्यामुळे खाजगी कंत्राटदारांना प्रवेश व रोहयोचा निधी खाजगी भू-विकासाकरता वापरण्यासाठी परवानगी देण्यात आली. म्हणजेच, आता अभिजनवर्गाच्या इच्छेनुसार रोहयोच्या अनुदानाचे वाटप अधिक निवडक होऊ घातले.

वत्स (२००५:१२) यांनी दाखवून दिल्याप्रमाणे, १९९०च्या दशकात रोहयोचा निधी विहिरी व फळबागांसारख्या वैयक्तिक संसाधनांमध्ये अधिक गुंतवला जाऊ लागला. या दशकात रोहयोच्या एकूण खर्चापैकी २५% खर्च हा वैयक्तिक संसाधनांच्या उभारणीवर केला गेला. तसेच, रोहयोच्या वेतनाचे दुपटीकरण झाल्यानंतरच्या आरंभीच्या वर्षांत (१९८६-१९९१) रोहयोतील वेतनावरील खर्चात ६३ टक्क्यांपासून ५२ टक्क्यांपर्यंत लक्षणीय घट झाल्याचे दिसून येते. दुसरीकडे, रोहयोच्या एकूण खर्चापैकी ३९.८ टक्के खर्च फलोत्पादन व जवाहर विहिर योजनेवर करण्यात आला -- म्हणजे, खाजगी जमीनधारक व खाजगी कंत्राटदार हे रोहयोचे सर्वाधिक लाभधारक ठरले. दारिद्र्यविरोधी कार्यक्रम म्हणून राबवल्या जाणाऱ्या रोहयोच्या हे तत्त्वाविरोधी होते [वत्स २००५:२९, तक्ता १४]. १९९०च्या दशकाच्या मध्यापासून रोहयोतील वेतनावरील खर्चाचा हिस्सा वाढला असला (२००१ मध्ये ८० टक्के) [वत्स २००५] तरी १९९०च्या दशकात सार्वजनिक संसाधनं निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर अल्प भर देण्यात आला. अंतिमत:, रोहयो ही एक अवर्षण निवारण योजनाच राहिली.

अभ्यासकांच्या आकडेवारीनुसार [देव २००१; मूर व जाधव २००५] एकूण महसुलात रोहयोवरील खर्चाच्या प्रमाणात व सरासरी श्रमदिनांच्या (man-days) संख्येत १९८८पासून घट झाल्याचे निदर्शनास येते. महत्त्वाचे म्हणजे, ही घट १९८८ मधील रोहयो कायद्यातील बदल व वेतनाच्या दुपटीकरणाच्या ताबडतोब नंतर प्रत्ययास येते. तसेच, रोहयोच्या कामांची संख्या राज्यभर, व खासकरून पश्चिम महाराष्ट्रात, घसरलेली आढळते. १९९०च्या दशकात राज्याच्या राजकारणात व अर्थकारणात झालेला हा बदल मी पुढील चार निकषांशी पडताळातून पाहिला -- १) लोक चळवळींची पीछेहाट, २) बिगर-कृषी रोजगार संधींची उपलब्धता, ३) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांची संख्यात्मक वाढ, व ४) शासनाचा वित्तीय हस्तक्षेप.

१९८०च्या दशकाच्या अखेरीस रोहयो वेतनवृद्धीनंतर, चळवळींतील अंतर्गत तणावांमुळे व रोहयोच्या कामांवर नोकरशाहीने मर्यादा घातल्यामुळे, रोहयोच्या योग्य अमलबजावणीसाठी क्रियाशील असलेल्या विविध NPPFsच्या विघटनाला सुरुवात झाली. त्यामुळे, राजकीय अभिजनवर्गावर रोहयो अमलात आणण्याबाबतचा दबावही ओसरला [जोसेफ २००५]. दरम्यान, रोजगाराच्या पर्यायी संधींची उपलब्धता वाढल्यामुळेही रोहयोच्या कामांच्या मागणीला ओहोटी लागल्याचे दिसते. पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हे व मराठवाडा व विदर्भातील अनुक्रमे औरंगाबाद व नागपूरसारख्या औद्योगिक जिल्ह्यांत दर डोई उत्पन्नात उल्लेखनीय वाढ झाल्याचे आढळते, ज्याचे श्रेय केवळ रोहयोला देता येत नाही (*जिल्हा सांख्यिकीय सारांश*, महाराष्ट्र शासन, १९९१-९२ व २००१-०२).

१९८०च्या दशकात रोहयोसोबत केंद्र सरकार पुरस्कृत व राज्य सरकारतर्फे कार्यान्वित केलेल्या अनेक समानधर्मी ग्रामीण रोजगार योजना अस्तित्वात आल्या, ज्यामुळे रोहयोचे वेगळेपण धूसर झाले. १९९०च्या दशकातील बदललेल्या राजकीय-आर्थिक वातावरणात वित्तीय तूट तीव्र बनली. रोहयोच्या कामांवर कमी खर्च करून वाचवलेला निधी जरी अधिकतरकरून पुढील वर्षातील रोहयो कामांसाठी वापरला जायचा तरी त्यातील काही हिस्सा वित्तीय तूट भरून काढण्यासाठीही उपयोगात आणला जाई. या अर्थी, रोहयोवरील बचत राज्य सरकारची विद्यमान आर्थिक परिस्थिती सुधारण्यात मदतकारक ठरत असे. दुसरीकडे, वेतनाच्या दुपटीकरणामुळे अत्याधिक खर्चाची धास्तीही वाढली. १९७०च्या दशकाच्या अखेरीपासून व १९८०च्या दशकातील अपूर्ण राहिलेल्या

रोहयो कामांच्या संख्येत होणाऱ्या वाढीचे सबब दाखवून राज्य सरकारने रोहयोखाली नवीन प्रकल्प राबवण्याचे थांबवले व परिणामी, रोहयोवरील रोजगारच्या मागणीला आळा बसला [मूर व जाधव २००५].

याच काळात सहकारी संस्थाही आर्थिक अरिष्टाने ग्रासल्यामुळे व पंचायती राज, सहकारी संस्था व रोहयोच्या उपक्रमांत बिगर-काँग्रेस पक्षांनीही शिरकाव मिळवल्यामुळे, पश्चिम महाराष्ट्रातील मराठा अभिजनवर्गाची आश्रयदाता व्यवस्थेवरील पकड ढिली पडली [अॅटवूड १९९२]. स्पर्धात्मक राजकारणातील पक्षीय पातळीवरील परस्परव्यापी व परस्परनिगडित दातृत्वामुळे, रोहयोच्या यशस्वी अमलबजावणीसाठी आता पक्षनिष्ठेपेक्षा, स्थानिक नेतृत्व व आमदार यांची राजकीय क्रियाशीलता व वैयक्तिक पाठपुरावा निर्णायक ठरू लागले [सावळे २००५].

थोडक्यात, दारिद्र्य निवारणाचा कोणताही कार्यक्रम आखताना, गरीबांव्यतिरिक्त त्या कार्यक्रमाशी निगडित इतर समाज घटकांकडून -- खासकरून अमलबजावणीच्याबाबतीत, स्थानिक अभिजन वर्गाकडून -- सहभागत्वाची व बांधिलकीची अपेक्षा ठेवताना, त्यांच्या आर्थिक हितसंबंधांची बूज राखायला हवी. भारतासारख्या सामाजिक-सांस्कृतिक वैविध्य व जातीय-वर्गीय विषमता असलेल्या लोकशाही राष्ट्रात तर हे विशेषकरून महत्त्वाचे ठरते.

[आभार : वरील संशोधन समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, व इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट (IDS), युनिव्हर्सिटी ऑफ ससेक्स यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. माझ्या व्यतिरिक्त पुणे विद्यापीठातील अनुराधा चारी, संजय सावळे व शाजी जोसेफ् हे सह-संशोधक व IDS मधील अनुराधा जोशी व मिक मूर यांचा या संशोधनात सहभाग होता. पुणे विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या सुजाता पटेल ह्या या संशोधन कार्यक्रमाच्या समन्वयक होत्या व त्यांनी पुणे विद्यापीठातील सह-संशोधकांना मार्गदर्शन केले. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांचा मी वरील निबंधासाठी आभारी आहे.]

**संदर्भ** :

अॅटवूड, डोनाल्ड (१९९२) : *रेझिंग केन — द पॉलिटिकल इकॉनॉमी ऑफ शुगर इन वेस्टर्न इंडिया*, वेस्ट व्ह्यू प्रेस, कोलॅरॅडो.

खेकळे, एन. (१९९९) : प्रेशर पॉलिटिक्स इन महाराष्ट्र, हिमालय पब्लिशिंग हाऊस, नॉयडा.

गेट, इ (१९८८) : 'गॅरंटीड एंप्लॉयमेंट इन ॲन इंडियन स्टेट — द महाराष्ट्र एक्सपिरिअन्स्', *एशियन सर्व्हे*, २८(१२):१२९४-१३१०.

चौसाळकर, अशोक (१९९५) : 'को-ऑपरेटीव्हज — हौ देअर लीडरशिप अफेक्टेड महाराष्ट्र पॉलिटिक्स', उषा ठक्कर व मंगेश कुलकर्णी (संपा) *पॉलिटिक्स इन महाराष्ट्र*, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई; पृ. ३३-४२.

जोसेफ्, शाजी (२००५) : 'पावर ऑफ द पीपल — पॉलिटिकल मुव्हमेंटस्, ग्रुप्स अँड गॅरंटीड एंप्लॉयमेंट' (अप्रकाशित लेख).

देव, महेंद्र (१९९६) : 'एंप्लॉयमेंट गॅरंटी स्कीम', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, ३१ (१२):५६०-५६३.

पळशीकर, सुहास (१९९४) : 'पॉलिटिक्स ऑफ महाराष्ट्र — अरायव्हल ऑफ बहुजन इडियम', *इंडियन जर्नल ऑफ पॉलिटिकल सायन्स*, खंड LV, नं. ३, जुलै-सप्टेंबर.

- " - व राजेश्वरी देशपांडे (१९९९) : 'इलेक्टोरल कॉम्पिटिशन अँड स्ट्रक्चर्स ऑफ डॉमिनेशन इन महाराष्ट्र', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, ऑगस्ट २१-२८; पृ. २४०९-२४२२.

पेंडसे, लालजी (१९६५) : *महाराष्ट्राचे महामंथन*, साहित्य सहकार संघ प्रकाशन, मुंबई.

बावीस्कर, बी. एस. (१९८०) : *द पॉलिटिक्स ऑफ डेव्हलपमेंट — शुगर कोऑपरेटीव्हज इन रुरल महाराष्ट्र*, ओ.यु.पी., दिल्ली.

मूर, मिक् व विशाल जाधव (२००५) : 'द पॉलिटिक्स अँड ब्युरोक्रॅटिक्स् ऑफ रूरल पब्लिक वर्क्स -- महाराष्ट्राज एंप्लॉयमेंट गॅरंटी स्कीम' (अप्रकाशित लेख).

रोझेन्थाल, डी. (१९८२) : '"मेकिंग इट इन महाराष्ट्र"', एन. आर. इनामदार (संपा) *काँटेंप्ररी इंडिया — सोशिओ-इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल प्रोसेसेस*, काँटिनेंटल प्रकाशन, पुणे; पृ. १-२८.

लेले, जयंत (१९९०) : 'कास्ट, क्लास अँड मोबिलायझेशन इन महाराष्ट्र', फ्रॅन्सीन फ्रँकेल व एम. एस. ए. राव (संपा) *डॉमिनन्स् अँड स्टेट पावर इन मॉडर्न इंडिया*, खंड २, ओ.यु.पी., दिल्ली.

वत्स, के. (२००५) : 'एंप्लॉयमेंट गॅरंटी स्कीम इन महाराष्ट्र: इटस् इंपॅक्ट ऑन ड्रॉट, पावर्टी अँड व्हलनरेबिलीटी', 'एंप्लॉयमेंट अँड इनकम् सेक्युरिटी इन इंडिया' या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातील निबंध, इन्स्टिटयूट फॉर ह्यूमन डेव्हलपमेंट, नवी दिल्ली.

वोरा, राजेंद्र (१९९६) : 'शिफ्ट ऑफ पावर फ्रॉम रूरल टू अर्बन सेक्टर', *इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली*, ३१(२): १६५-१७०.

- " - व सुहास पळशीकर (१९९६) : *महाराष्ट्रातील सत्तांतर*, ग्रंथाली, मुंबई.

सावळे, एस. (२००४) : '"इज लोकल रियली बेटर?" — कम्पेरिंग EGS अँड लोकली-मॅनेज्ड रूरल वर्क्स प्रोग्रॅम्स इन नाशिक डिस्ट्रिक्ट' (अप्रकाशित लेख).

सुब्रह्मण्यम्, व्ही. (१९७५) : *पार्चड् अर्थ — द महाराष्ट्र ड्रॉट, १९७०-७३*, ओरियंट लाँगमन, हैदराबाद.

हेरिंग, आर. जे. व आर. एम. एडवर्डस् (१९८३) : 'गॅरंटींग एम्प्लॉयमेंट टू द रूरल पुअर -- सोशिअल फंक्शन्स् अँड क्लास इंट्रेस्टस् इन द एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम इन वेस्टर्न इंडिया', *वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट*, वाशिंग्टन DC; जुलै.

**स.प्र.प.**

ghraja@rediffmail.com